ISSN 2231-1629
Knowledge Resonance
IMPACT FACTOR 8.072
July – December 2021- Vol. 10 No. 2

# बेकारी सामाजिक समस्याः एक समाजशास्त्रीय अध्यन

**प्रा. डॉ. राजेंद्र यादवराव बारसागडे**
*समाजशास्त्र विभागप्रमुख*
*एफ.ई. एस. गर्ल्स कॉलेज, चंद्रपूर*

***सारांश***
*भारताला आज तरूणाचा देश म्हणुन ओळखले जाते परंतु देशाच्या वाढत्या लोकसंख्ये मुळे देशातील तरूणाच्या हाताला काम मिळत नाही. अनेक लोकाना बेकार राहावे लागते. बेकारी मुळे अनेक युवक हताश होत आहेत. अनेक यूवकानी स्वतःला संपविले आहे काही संपवण्याच्या विचारात आहेत. देशातील वाढत्या बेकारीचा परिणाम देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पनावर पडते. देशात गरीब व दारिद्रयाचे प्रमाण वाढत आहे. बेकारीचा परिणाम देशाच्या अर्थव्यवस्थेवर पडत असल्याने देशाच्या अर्थव्यवस्थेला एक प्रकारे धोका निर्माण होत आहे. बेकारीमुळे देशाच्या साधन संपत्तीचा अपव्यय होत आहे. वर्तमान समाजात. बेकारी या समस्येकडे भारतीय समाजातील एक  सामाजिक समस्या म्हणून पाहिले जाते. बेकारी या समस्येचा परिणाम देशावर तथा समाज व कुटूबावर पडत आहे. देशात बेकारी 2014 मध्ये 14 कोटी होती तर 2018 मध्ये 30कोटी झाली. बेकारीमुळे देशात गुन्हेगारी, बालगुन्हेगारी, भिक्षावृत्ती, आत्महत्या कोटुबिक तणाव, घटस्फोट यासारखे प्रश्न आज निर्माण झालेले आहे. बेकारीचा प्रश्न हा केवळ भारतातच नाही तर प्रगत समजल्या जाना–या देशात सुध्दा आहे परंतु इतर देशाच्या मानाने भारतात अधिक असल्याने भारताला आज बेकारीचे माहेरघरच मानले जाते. सरकार बेकारी समस्या सोडविण्याच्या दृष्टिने विविध धोरण व उपाययोजना करीत आहे परंतू बेकरीचा प्रश्न मात्र सुटलेला नाही.*

***मुख्यशब्द*** *: बेकारी भारताती एक सामाजिक समस्या, लोकसंख्यावाढ, गुन्हेगारी, बालगुन्हेगारी, बेकारी देशाच्या विकासास बाधा.*

**प्रस्तावना**

भारताला आशियाखंडातील एक बलाढय देश म्हणून ओळखले जाते. 21 व्या भातकात भारतीय समाजाचे अवलोकन केले असता देशात अनेक सामाजिक समस्या आढळुन येतात, ज्यात प्रामुख्याने दारिद्रय, उपासमार, काळाबाजार, भ्रष्टाचार, गुन्हेगारी, बालगुन्हेगारी, वृध्दांची समस्या,नक्षलवाद, भिक्षावृती, अशा अनेक सामाजिक समस्या भारतीय समाजात आहेत व त्यातीलच एक समस्या ही  बेरोजगारी आहे. वैज्ञानिक प्रगतीमुळे एकीकडे आपण स्वतःला विकसित समजू लागलो व मानवी विकासाचा आधार हा आर्थिक घटक समजू लागल्याने आर्थिक घटकच हा प्रगतीचा आधार ठरलेला आहे. देशाची दिवसेंदिवस वाढत असलेली लोकसंख्या व वर्तमान समाजात लागलेले नवनवीन शोध व नवनवीन यंत्रतत्रांची निर्मिती व त्यातुनच निर्माण होणारे मोठमोठे कारखाने यामुळे ग्रामीण समाजातील पारंपारिक व्यवसाय व उधोग नष्ट झाले त्यामुळे ग्रमीण समाजातील लोकांपुढे रोजगाराचा प्रश्न निर्माण झाला. तर शिक्षणाच्या वाढत्या प्रचार व प्रसारामुळे युवक शिक्षण घेऊ लागले व शिक्षणच हे प्रगतीचे लक्षण समजू लागले. शिक्षण म्हणजे नोकरी प्राप्त करण्याचा एकमेव साधन होय हा समज लोकांमध्ये निर्माण झाल्याने मोठया प्रमाणात लोक आपल्या मुलांना शिक्षण घेण्यास प्रवृत्त करू लागले. परंतु वाढत्या लोकसंख्येमुळे युवकांना नोकरी मिळेणाशी झाल्याने आज मोठया प्रमाणात देशापुढे बेकारीचा प्रश्न निर्माण झालेला आहे. बेकारीचा प्रश्न केवळ विकसित व विकसनशील देशापुढेच नाही तर प्रगत समजल्या जाणा–या अमेरीका, इग्लंड या देशा पुढे सुध्दा बेकारीचा प्रश्न निर्माण झालेला आहे. भारताला 15 ऑगष्ट 1947 ला स्वातंत्र्य मिळाले तेव्हा देशात लोकसंख्या ही मर्यादित होती देशात बेरोजगारीचा प्रश्न नव्हता पण जेव्हा औधोगिक प्रगतीस चालना मिळाली, नवनविन यत्रंतत्रांची निर्मिती व नवनविन शोधामुळे देशात मोठमोठे उधोगधंदे व कारखान्याची निर्मिती करण्यात आली. 1980 ते 1995 या काळात बेरोजगारीचा प्रश्न फार मोठया प्रमाणात निर्माण झाला. परंतू देशात मुक्त अर्थव्यवस्थेला चालना दिल्या नतंर देशात रोजगार निर्मितीचा प्रश्न काही प्रमाणात कमी झाला. आज लोकांमध्ये असलेली आळशीवृती व्यक्तिगत कारण,भोतीचे मागासलेपणा, ग्रामीण उधोगांचा –हास, नवनविन तंत्राची निर्मीती, देशाची दिवसें दिवस वाढती लोकसंख्या यामुळे देशातील युवकाना नोकरी मिळेनाशी झाल्याने आज मोठया प्रमाणात देशापुढे बेकारीचा प्र" न निर्माण झालेला आहे. बेकारीचा प्रश्न केवळ भारतापर्यंत मर्यादित नसून बेकारी आज एक  जागतिक समस्या ठरलेली आहे.

**संशोधनाचा उद्देश** :

1. बेकारी समस्या निर्मितीच्या कारणाचा शोध धेणे
2. बेकारीचा कुटूंबावर व समाजावर कोणते परिणाम होतात याचा अभ्यास करून त्यावर उपाय सुचविणे.

**गृहितकृत्य** :

लोकसंख्यावाढीमुळे बेकारी निर्माण होते. बेकारीचा परिणाम कुटूंबावर व समाजावर पडत आहे.

**तथ्य सकंलन पध्दती** :

संदर्भ पुस्तके, वर्तमानपत्रे, सोशल मिडीया या दुय्यम स्त्रोताच्यां माध्यमातून माहिती संकंलन करणे

**बेकारीचा अर्थ** : वर्तमान समाजात बेकार किवा बेरोजगार या शब्दाचा आपण नित्य वापर करीत असतो. बेकार म्हणजे ज्याला काम नाही अशी व्यक्ती होय. परंतु यातुन बेरोजगार या भाब्दाचा खरा अर्थ पुर्णता स्पष्ट होत नाही. बरेचदा काही व्यक्तीना रोजगार मिळते परंतु व्यक्तीच्या आळशी प्रवृतीमुळे काम करण्याची इच्छा नसते त्यांना

देखील बेकार म्हणून समजले जाते करीता बेकारीचा शास्त्रीय अर्थ लक्षात घेणे आवश्यक असते. बेकारी बाबत फेयर चाईल्ड म्हणतो कि मजुरी करणा–या सामान्य वर्गाच्या एका सभासदाला सामान्य वेतनावर आणि सामान्य काम करणा–या परिस्थीत वेतन मिळणा–या कामापासून अनिच्छेने किंवा जबरदस्तीने वेगळे ठेवले जाते त्यास बेरोजगार म्हटले जाते. तर डॉ. आर. सी. सक्सेना बेकारी बाबत म्हणतो एक व्यक्ती जी काम करण्याच्या दृष्टिने लायक आहे आणि काम करण्याची त्याची इच्छा आहे त्यास देशात प्रचलित मजुरीच्या दरात काम न मिळने म्हणजे बेरोजगारी होय. एकदंरीत बेकारी म्हणजे एक प्रकारे व्यक्तीला कामकरण्याची इच्छा असुन त्या व्यक्तीस काम मिळत नाही तेव्हा त्या स्थीतीला बेकार असे म्हणता येथे. देशात बेरोजगारी ही हगांमी, कृषीसंबधी बेकारी, औद्योगिक बेकारी, एच्छिक बेकारी, तात्रिंक बेकारी, सुशिक्षित बेकारी या सारखे बेकारीचे रूप आपणास दिसून येते.

**बेकारी निर्मितीची कारणे** :

1. देशाच्या लोकसंख्यावाढीचा दर हा स्वातंत्र्यप्राप्ती नतंर अधिक वाढला त्यामुळे काम करणा–या लोकांचे प्रमाण वाढले परंतू त्यामानाने देशात रोजगाराच्या सोई सुविधा व नोकरी चे प्रमाण उपलब्ध न झाल्याने देशात बेकारीचा प्रश्न निर्माण झाला.
2. शेतकरी आपली शेती ही पंरपंरागत व मागासलेल्या पध्दतीने करीत असतात त्यामुळे शेतीतून उत्पादन कमी होते व यातुन गरजा पुर्ण होत नाही व शेती कुटूंबातील प्रत्येक व्यक्तीलारोजगार देऊ शकत नाही त्यामुळे अनेकाना रोजगारा पासून वंचित रहावे लागते.
3. भारताला ग्रामीणांचा देश म्हणुन ओळखले जाते व पूर्वी ग्रामीण भागात लघु व कुटीर उद्योग मोठया प्रमाणात असायचे त्यामुळे लोकांना गावातच रोजगार मिळायचा परंतु औद्योगिकीकरण, नागरीरकरण या घटकामुळे ग्रामीण भागातील लधु व कुटीर उधोगांचा ऱ्हास झाला अनेक कुटीर उधोग बंद पडले परिणामतः अनेकाचे रोजगार बुडाले व ग्रामीण लोकांणपुढे बेकारीचा प्रश्न निर्माण झाला.
4. भारताला जगाच्या पाठीवर कृषीप्रधान देश म्हणून ओळखल्या जाते देशातील 75 टक्के लोक ग्रामीण भागात वास्तव्य करतात व या लोकांचा प्रमुख व्यवसाय हा भोती होता व शेतीच्या हगांमात लोकाना रोजगार मिळत असे परंतु भोतीचा पाहिजे त्या प्रमाणात विकास न झाल्याने लोकांना वर्षभर रोजगार न मिळाल्यामुळे लोकाना रोजगारा पासुन वंचिंत राहावे लागते.
5. वर्तमानात दिले जानारे शिक्षण हे व्यवसायाभिमुख नसल्याने युवक युवती केवळ विद्यापीठातुन पदव्या घेऊन बाहेर पडतात त्यातून व्यवसायिक कौशल्य अवगत नाही त्यामूळे त्याना थेट नोकरी मिळत नाही किंवा कोणताही व्यवसाय करण्याची पात्रता प्राप्त होत नाही त्यामुळे व्यवसायिक शिक्षणा अभावी बेरोजगारीचा सामना करावा लागतो.
6. उच्च शिक्षण घेतलेले युवक श्रमकरायला तयार नसतात. शिक्षित युवकांना केवळ शासकीय नोकरी हवी असते परंतु वर्तमानकाळा सर्वाना नोकरी मिळत नाही त्यामुळे अनेकांना बेकारीचा सामना करावा लागतो.
7. जेव्हा देशात आर्थिक मंदी निर्माण होते तेव्हा उत्पादनाची मागणी कमी असते अशा प्रसंगी उद्योजक कमी उत्पादन करीत असतात. व उद्योजक श्रमिककाना कामावरून कमी करत असतात त्यामुळे रोजगार निर्माण होत नाही व अशा परिस्थितीत अनेक श्रमीकाना रोजगारा पासून वंचित राहावे लागते.
8. कोरोनाच्या काळात देश विदेशातील सरकारने देशात लॉकडाऊन केले त्याचा पटका उद्योगांवर बसला सगळे उद्योगबंद पडले परिणामतः देशात व विदशात काम करणाऱ्या युवाकांचे रोजगार गेले.
9. अनेकदा समाजात बेकारी निर्माण होण्यास व्यक्ती स्वतः जबाबदार असतो. युवकांमध्ये असलेली आळशीवृत्ती, लट्ठ पगाराच्या नोकरीची अपेक्षा, कष्टाचे काम नको असणे,गाव सोडून बाहेर गावी जाण्याची मानसिकता नसणे इत्यादी वैयक्तिक कारणांमुळे बेकारी निर्माण होते.
10. शिक्षणाप्रमाणे नोकरी मिळावी अशी युवकांची रास्त अपेक्षा असते परंतु ही अपेक्षा पुर्ण होत नाही व युवक युवती लहान पदावर काम करण्यास तयार नसतात त्यामुळे युवकांमध्ये निराशा निर्माण होते व नोकरी साठी असलेली वयोमर्यादा ओलांडली जाते आणि त्याना आजन्म बेरोजगार राहण्याची वेळ येते.
11. औद्योगिकिकरणामुळे अनेकां रोजगार मिळते परंतु आपल्या देशात लोकसंख्येच्या मानाने औद्योगिक विकास पाहीजे त्याप्रमाणात झालेला नाही त्यामुळे सुध्दा देशात बेकारीचा प्रश्न निर्माण झालेला आहे.
12. आधुनिक तंत्रज्ञाच्या विकासामुळे मानवरहित यंत्राची निर्मिती झाल्यामुळे एकच यंत्र अनेक मजुरांचे काम करतो त्यामुळे कारखान्या मध्ये मजुरांची आवश्यकता भासत नाही त्यामुळे पात्रताधारकांनाही रोजगार मिळत नाही.

**बेरोजगारीचे दुष्परिणाम** :

1. जेव्हा व्यक्तीला काम करण्याची इच्छा असते परंतु व्यक्तीला काम मिळत नाही तेव्हा त्याचा परिणाम व्यक्तीच्या मनावर होतो. व्यक्तीला निराशा येते, व्यक्ती हतबल होतो, व्यक्तीच्या अपेक्षा भंग पावतात,समाजात अपमानस्पद वागणूक मिळते, रोजगारा अभावी सतत मानसिक तनाव असते. शिक्षणावरील विश्वास उडतो. व्यक्ती समाजनियमा विरूध्द वागायला लागतो.
2. युवक हा बेरोजगार असेल त्याचा परिणाम कुटुंबावर होतो. कुटूंबातील अनेक सदस्य त्यास टोचुन बोलतात. कुटूंबात नेहमी तनाव निर्माण होते व शेवटी कुटूंबांचे विघटन होते.
3. बेकारीमुळे देशात गुन्हेगारी, बालगुन्हेगारी, व्यसनाधिनता, आत्महत्या, या सारख्या अनेक सामाजिक समस्यांची निर्मिती होते.

4. देशातील लोकसंख्या वाढली, उद्योगधंदे वाढले परंतु त्या मानाने रोजगार वाढले नाही. परिणामतः अनेकांना बेरोजगारीचा सामना करीत हलाखीचे जीवन जगावे लागते.
5. बेरोजगार व्यक्ती आपल्या कुटूंबाच्या मुलभूत गरजा पुर्ण करू भाकत नाही व मुलांना उच्च शिक्षण देऊ भाकत नाही त्यामुळे दारिद्रयात जीवन जगावे लागते व मुले शिक्षणा पासून वचित राहतात.
6. शिक्षणाच्या वाढत्या प्रसार व प्रचारामुळे युवक हा नोकरीच्या अपेक्षेने उच्च शिक्षण घेतो परंतू शैक्षणिक पात्रता असूनही नोकरीसाठी वणवण भटकावे लागते. परंतू नोकरी काही मिळत नाही त्यामूळे युवकांमध्ये प्रचंड नैराश्य येते व ते आत्महत्या करण्यास प्रवृत्त होतात.
7. कोणत्याही देशाच्या विकासात आज प्रमुख अडथळा म्हणुन बेकारीचा उल्लेख केला जातो.बेकारी समाजाला एक अभिशाप मानले जाते.बेकारी मुळे देशातील सकल राष्ट्रीय उत्पन्न कमी होते. समाज गरीब व मागासलेला बनतो.
8. बेरोजगारीमुळे देशाच्या अर्थव्यवस्थेच्या सुरक्षिततेला एक प्रकारे धोका निर्माण होतो.
9. बेकारीमुळे व्यक्तीला जीवन जगण्यासाठी लागणा–या किमान गरजाची पुर्तता होत नाही.बेकारीमुळे देशात 40 टक्के लोक दारिद्रयात जीवन जगत आहेत.
10. बेकारीमुळे व्यक्तीचा व कुटूंबाचा आर्थिकस्तर खालवतो,
11. बेकारी आणि दारिद्रयाचा निकटचा सबंध असल्याने व्यक्तीला रोजगार मिळत नसल्याने व्यक्ती हा दारिद्रयाच्या खाईत लोटला जातो
12. कोणत्याही देशाच्या विकासात आज प्रमुख अडथळा म्हणुन बेकारीचा उल्लेख केला जातो.बेरोजगारी समाजाला एक अभिषाप ठरत आहे.
13. लाखो युवकांना देशात नोकरी व रोजगार नाही त्याचा परिणाम त्यांच्या आर्थिक स्थीतीवर होत असतो.

## बेकारी समस्येवर उपाय

1. देशातील युवकांना बेकारी या अवस्थेतून बाहेर पडायचे असेल तर नोकरीवर अवंलबुन न राहता स्वयंरोजगाराकडे वळावे.
2. पुर्वी समाजात शेतीकडे आर्थिकसाधन म्हणुन पाहिले जात होते त्याच भावनेतुन युवकांनी शेतीकडे आज पहावे तसचे लधु व कुटीर उद्योगांना प्रोत्साहन देऊन युवकांना प्रवृत्त करावे.
3. शासनाने बेकारी या समस्येवर मात करण्या करीता जास्तीत जास्त रोजगार निर्माण करावे.
4. वर्तमान शिक्षण पध्दतीत बदल करून शिक्षणाला व्यवसायभिमुख करावे.
5. काळ बदलला असला तरी आपली शेती करण्याची पध्दत मात्र आजही पांरपारीक आहे व या पध्दतीतून शेती पुर्णता रोजगार देऊ शकत नाही करीता युवकानी आधुनिक पध्दतीने शेती करावी. जेनेकरून शेतीचे उत्पादन वाढेल व युवकाना रोजगार मिळेल.
6. सरकारने स्किल इडिंया, मेकइन इंडिया, स्टार्ट–अप इडिंया यासारख्या योजना प्रभावी पणे राबवाव्या जेने करूण देशातील युवकांना त्याचा लाभ होईल.
7. सरकारने शिक्षित युवकाना बिन व्याज स्वरूपात स्वतःचा व्यवसाय सुरू करण्याकरीता कर्ज देण्यात यावे.
8. देशात विविघ सामाजिक समस्या निर्माण करण्यास देशाची वाढती लोकसंख्या जबाबदार मानले जाते त्यात बेकारी सुध्दा अपवाद नाही. करीता लोकसंख्यावाढीवर शासन स्तरावर कठोर नियम करावे जेणे करूण देशाची लोकसंख्या कमी होइल व देशात बेकारी सारखे प्रश्न निर्माण होणार नाही
9. बेकारी या समस्येवर मात करण्याकरीता सर्वपक्षाच्या लोकांनी एकत्रित येऊन एक राष्ट्रीय धोरण ठरवावे व त्यास सर्वानी पाठींबा दयावा.
10. सरकारने राष्ट्रीय ग्रामीण विकास योजना, ग्रामीण भुमिहिन योजना, बेरोजगारी हठाव कार्यक्रम जवाहर रोजगार योजना यासारखे कार्यक्रम राबवित आहे शासकीय योजनाचा लाभ घेण्यास.युवकांना प्रवृत्त करावे.
11. शासनाने गाव तेथे रोजगार ही संकल्पना अमलात आनल्यास गावातील युवकांना गावातच रोजगार मिळेल.

## निष्कर्ष

1. लोकसंख्येचा प्रचंडस्फोट झाल्यामुळे प्रत्येकाला रोजगार उपलब्ध होऊ शकत नाही व बेकारीची समस्या उदभवते.
2. बेकारीमुळे कुटूंबाचा आर्थिकदर्जा खालवतो व पर्यायाने समाजाचाही आर्थिकदर्जा खालवतो.
3. शिक्षण हे व्यवसायाभिमुख नसल्यामुळे युवकांमध्ये व्यवसायिक पात्रता निर्माण होत नाही
4. शासनाद्वारे रोजगाराच्या पुरेशा संधी उपलब्ध होत नाही.

## सदंर्भ

1. *आगलावे प्रदिप, आगलावे सरोज, भारतीय समाज संरचनात्मक प्रश्न आणि सामाजिक समस्या, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, जुलै 2018*
2. *क–हाडे बी. एम. भारतीय समाज प्रश्न आणि समस्या भाग –2, पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर ऑक्टोबर 2013*
3. *marathigyaan.com*
4. *https://mr.alinks.org*
5. *https://mrvikaspediai.in*
6. *mr.m.vikpedia.org*